पोलीस आयुक्तालय,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

**— प्रेस नोट —**

दिनांक १२.११.२०२१ व १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती. त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम — १४४ जा.फौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

अमरावती शहरात मा. डॉ. आरती सिंह, पोलीस आयुक्त, अमरावती यांनी दिनांक १६.११.२०२१ चे २३.०० वा.दिनांक १७.११.२१ चे पहाटेपर्यंत पो. ठाणे कोतवाली, नागपुरी गेट, खोलापुरी गेट हद्दीतील राजकमल चौक, गांधी चौक, साबणपुरा, जवाहर गेट, मयुर चौक, टांगा पडाव, हनुमान नगर तसेच, पठाण चौक, चांदणी चौक येथील संपुर्ण भागाची पाहणी करुन संचारबंदी बंदोबस्तातील अधिकारी व अंमलदार यांचेसोबत शहरातील शांततेबाबतचा आढावा घेवुन बंदोबस्ताबाबत व कलम — १४४ जा.फौ.चे तंतोतंत पालनाबाबत सुचना दिल्यात. दरम्यान राजकमल चौक येथे एक संशयीत ट्रिपल सिट मोटार सायकल स्वार मिळून आल्याने त्याला पुढील कारवाईकरीता पो.ठाणे कोतवाली यांचे ताब्यात दिले.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे व अफवावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन मा. डॉ. आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती